# जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय

---

## आंतर कार्यासन संदेश

क्र.सटीएस/सीआर/कावि २६/ना.भू.४/१०
पुणे दिनांक ५/१/२०११

प्रेषक,
डॉ. विजय वीर
कार्यालय अधीक्षक ना.भू.४
जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे

प्रति,
डॉ. लालसिंग मिसाळ
कार्यालय अधीक्षक आस्था-३
जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे

**विषय:- माहिती अधिकार अधिनियम २००५**

**मा.राज्य माहिती आयुक्त,पुणे खंडपीठ यांचेकडील दि.३/१/११ रोजीचे आदेश.**

**संदर्भ :-** आपलेकडील पत्र क्र.के.मा.अ.०५/प्र.क्र. ४२/१० दि.४/१/२०११

उपरोक्त विषयांकीत बाबत मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांचेकडील दिनांक ३/१/२०११ रोजीचे आदेशानुसार कै.सतीश शेट्टी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या तक्रारीबाबत केलेली कार्यवाही व कारवाई याची माहिती मागणारे श्री. अरूण माने यांच्या अर्जानुसार सर्व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी सर्व माहिती विनाविलंब जाहीर करणे आवश्यक आहे, त्याअनुषंगाने त्यांनी केलेले अर्ज व त्यावर केलेली कार्यवाही ही माहिती देणेबाबत संदर्भीय पत्राने कळविले आहे.

या संकलनाकडील माहिती अधिकार नोंदवही व प्रकरणांच्या नोंदवहीचा शोध घेतला असता नागरी भूमापन-४ या संकलनाकडे प्रकरण सिटीएस/सीआर ६४८५/२००१ उपलब्ध असून त्याच्या छायांकित प्रती सोबत सादर केल्या आहेत. तरी यापुढील योग्य ती कार्यवाही आपले संकलनाकडून व्हावी. (आपण मागणी केलेप्रमाणे माहिती दिली असे).

(डॉ. विजय वीर)
कार्यालय अधीक्षक ना.भू.४
जमाबंदी आयुक्त कार्यालय,पुणे

दा. ना. ५/१/११

का. अ. आ. ३

☎ : निवास (०२११४) २४५४६
कार्यालय : (०२०) ४४५१३९८

# भ्रष्टाचार विरोधी

## जन आंदोलन (महाराष्ट्र)

✲ पुणे जिल्हा अध्यक्ष ✲ **श्री. शहाजी शिंदे**
✲ संस्थापक अध्यक्ष ✲ **मा. अण्णासाहेब हजारे**
✲ पुणे जिल्हा संघटक ✲ **श्री. सतीश शेट्टी**

'कलानिवास', पंचवटी कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे ४१० ५०६. कार्यालय : ३०१, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.

सदर्भ क्र. : दिनांक :

25 OCT 2001

ता. २५/१०/२००१.

मा. विभागीय आयुक्त सो.
कौन्सील हॉल
पुणे- १.

विषय :- अनाधिकृत बेकायदेशिर बांधकाम असताना देखील बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र देणे - तसेच चुकीची मोजणी करून गैरप्रकार करणारे सी.टी.सर्व्हेचे अधिकारी अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करणे बाबत.

महोदय,

तळेगाव दाभाडे न.पा. हद्दीतील पुना-मुंबई राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा (ॲप्रोच ) नियोजीत ६० फुट / १८.२९ मीटर रस्त्यावर बिल्डर श्री कान्हु नाना पडवळ (विशाल सागर कंस्ट्रक्शन) यांनी सर्व नियम कायदा धाब्यावर बसवुन बेकायदेशीर बांधकामे केलेली असताना देखील सदर बांधकामांना संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिलेली आहे. (कंप्लीशन सर्टीफोकेट ) या बाबत पुराव्यासह अनेक तक्रारी या पुर्वी दिलेल्या आहेत. त्याची चौकशी वेळोवेळी करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे काहींबाबत कारवाई देखील सुरू झालेली आहे. सी.टी.एस.न. ५३०४/१, ५३०४/२-भंडारी हॉस्पीटल समोरील इमारत, सरकारी धान्य गोडाऊन शेजारील इमारत व स्टेशन परिसरातील इतर इमारती बाबत.

त्याचप्रमाणे सी.टी.सर्व्हेच्या वेळोवेळी अधिकारपदावर असणाऱ्या अधिकारी यांनी चुकीच्या मोजण्या करून चुकीचे नकाशे तयार केले. या बाबत सीटी सर्व्हेच्या वरीष्ठ अधिकारी यांचेकडे तक्रारी दिल्यानंतर, त्यांनी तिऱ्हाईत अधिकारी यांचे मार्फत मोजणी करून घेतली. त्यामध्ये इतर अधिकारी यांनी केलेल्या सर्व चुकीच्या बाबी समोर उघड झालेल्या आहेत. याबाबत पुर्वीच्या मोजणीचा नकाशा दर्शीविलेल्या

दि.ना. : २५/१०/०१

☎ : निवास (०२११४) २४५४६
कार्यालय : (०२०) ४४५१३९८

निर्भय बनो !

# भ्रष्टाचार विरोधी

## जन आंदोलन (महाराष्ट्र)

✲ पुणे जिल्हा अध्यक्ष ✲
श्री. शहाजी शिंदे

✲ संस्थापक अध्यक्ष ✲
मा. अण्णासाहेब हजारे

✲ पुणे जिल्हा संघटक ✲
श्री. सतीश शेट्टी

'कलानिवास', पंचवटी कॉलनी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे ४१० ५०६.  कार्यालय : ३०१, नारायण पेठ, पुणे ४११०३०.

संदर्भ क्र. :  दिनांक :

इमारतीसह/बांधकामासह व नव्याने मोजणी केलेला नकाशाच्या झेरॉक्स प्रती सोबत देत आहे. सी.टी.एस. नं. ५३०४/१ व ५३०४/२.

या बाबत शेजारीच महाराष्ट्र शासनाचे पशुसंवर्धन केंद्र आहे. सदर केंद्र संचालक यांनी श्री. पडवळ यांनी त्यांचे तारेचे कंपौड तोडून सदर केंद्राची जागा बळकावली या बाबत तक्रार दिली होती. परंतू विकले गेलेल्या सी.टी. सर्व्हेच्या अधिकारी यांनी त्याची दखल घेतली नाही. आता नविन झालेल्या मोजणीत सदर केंद्राची १०७ चौ.फूट जागा श्री. पडवळ यांनी बळकवल्याचे सिध्द झाले आहे.

तळेगांव दाभाडे शहराची झपाटयाने वाढ झालेली आहे व होत आहे. लोकसंख्या दररोज वाढत आहे. पी.एम.टी., पी.सी. एम.टी. कंपनीच्या बसेस तसेच खाजगी चार चाकी व दुचाकी वाहनांची संख्या दररोज वाढत आहे. त्या मानाने रस्ते फारच अपुरे पडत आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाच अपुऱ्या रूंदीच्या रस्त्यांमुळे तळेगांव स्टेशन चाकण रस्त्यावर बरेच अपघात होऊन त्यात अनेकांना प्राणास मुकावे लागले आहे. याचा संपूर्ण विचार या पुर्वीच न.प. व नगर रचना खाते यांनी करून असे नियोजीत रस्ते दर्शविलेले आहेत.

या बाबत अशा बेकायदेशीर व नियमबाहय असणाऱ्या बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र देणे, वरीष्ठ अधिकारी यांना चुकीची माहिती देणे तसेच चुकीची मोजणी करणारे सी.टी.सर्व्हे अधिकारी व कर्मचारी अशा सर्वांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

प्रत-योग्य त्या कारवाईसाठी
✓ मा. जमाबंदी आयुक्त सो
तथा संचालक
महाराष्ट्र राज्य
पुणे १.

आपला विश्वासू,

S B Shetty

श्री. सतिश शेट्टी
भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन
(महाराष्ट्र) पुणे जिल्हा संघटक

नभू-२/ कावि-४२३/२००१,
सीटीएस/सीआर-६४७३+६४८५/०१,
पुणे, दिनांक २९ / ५ / २००४.

प्रति,
मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भू. अ. पुणे
25 MAY 2004

विषय :-तळेगांव दाभाडे येथील न.भू.क्र.५३०४/१ व ५३०४/२ चे निमताना मोजणी बाबत.

संदर्भ :-१) आपले कडील पत्र क्र.सीटीएस/सीआर-६४७३/नाभू-४/०१, दिनांक २१.९.२००१, सीटीएस/सीआर-६४७३+६४८५/०१,दि. २२.१.०२, ३.४.०२ ,१६.७.०२, ९.१२.०२ व ३.३.०३.
२) अ.भू.अ.पुणे यांचे कडील पत्र क्र.आस्था-१/कावि-१८९/२००१, पुणे, दिनांक ३१.३.२००४.

विषयांकित बाबत अधीक्षक भूमि अभिलेख पुणे यांचे संदर्भीय पत्र क्र. २ ने या कार्यालयास सादर केलेल्या अहवालाचे अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

विषयांकित बाबत आपले दिनांक २१.९.२००१ चे पत्रा सोबत प्राप्त झालेल्या अर्जदार यांचे अर्जात त्यांनी मोजणी कामी हरकत घेतली असता मोजणी का झाली अशी तक्रार केली आहे.

मौजे-तळेगांव दाभाडे, तालुका मावळ येथील न.भू.क्र.५३०४/१ व ५३०४/२ चे धारक श्री.कान्हु नाना पडवळ यांनी दिनांक २८.२.९६ चे मोजणीवर निमताना मोजणी मागितलेने सदर न.भू.क्र. निमताना मोजणी मो.र.नं.२३६/९९ दिनांक ३०.११.९९ ने करुन अर्जदार यांना तसे दिनांक २२.१२.९९ चे पत्राने निकाली उत्तर दिले. त्यानंतर श्री.सतीश शेट्टी भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन (महाराष्ट्र ) यांनी आपणाकडे केलेल्या तक्रार अर्जानुसार या कार्यालयाकडील दिनांक ९.३.२००१ चे पत्रानुसार सि.स.नं.५३१०,५३०४/१ व ५३०४/२ या मिळकतीची मोजणी परिरक्षण भूमापक तळेगांव यांनी तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, मावळ यांचे समवेत दिनांक ७/४/२००१ राजी केली.

श्री.शेट्टी यांचे दिनांक १५.५.२००१ रोजी आपणाकडे केलेल्या अर्जा नुसार सदर मिळकतीचे निमताना मोजणी कामाची तत्कालीन अधीक्षक भूमि अभिलेख सांगली यांनी तपासणी केली तपासणी अंती अधीक्षक भूमि अभिलेख सांगली यांनी त्यांचेकडील आदेश क्र. नभू-२/तळेगांव दाभाडे / फेरमोजणी ५३०४/१ व ५३०४/२ या मिळकतीची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, मावळ यांनी मो.र.नं.२३६ दिनांक २३.११.९९ रोजी केलेला निमताना नकाशा रद्द करणेत आलेले आदेशात नमुद केले आहे व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख मावळ यांनी सदर मिळकतीची जागेवरील वस्तुस्थिती इमारती,वॉल कपांऊड इत्यादि पुन्हा मोजणी करुन संबधीताना हद्दीच्या खुणा दाखविण्यात यावे असे आदेश दिले होते. त्यानुसार तालुका निरीक्षक भूमि अभिलेख मावळ यांनी सर्व संबधीताना आगाऊ कळवून सदर मिळकतीची दिनांक २०.९.२००१ रोजी मोजणी करुन दिनांक २१.९.२००१ रोजी संबधीताना हद्दीच्या खुणा दाखविल्या आहेत. तसा संबधीत अर्जदार, तक्रारी अर्जदार व लगत धारकांनी जबाब दिला आहे व दिनांक ६.१०.२००१ चे पत्राने मोजणी कामी आता काहीही

होणेचे राहीले नसलेचे कळवून मोजणी नकाशाची प्रत दिलेचे अधीक्षक भूमि अभिलेख पुणे यांनी अहवालात नमूद केले आहे. तसेच दोषी कर्मचारी व अधिकारी संबंधीतावर विभागीय चौकशी कार्यवाही प्रगतीत आहे. अहवाल अवलोकन होऊन पसंतीनुरुप पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

स्थळ प्र.वर मा.उ.सं.भू.अ.
पुणे यांची स्वाक्षरी असे.

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश,पुणे यांचे करिता.

प्रत :-अधीक्षक भूमि अभिलेख पुणे यांना माहिती वकार्यवाहीसाठी रवाना.

२/- जिल्हा पशुसंवर्धन उपसंचालक पुणे जिल्हा यांचे दिनांक ३.१०.०१, ७.११.०१ ,७.४.०३, १३.६.०३ चे अर्जात एक मिटरचा फरक असलेचे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने त्यांना योग्य ते उत्तर देऊन प्रत सादर करावी.

क्रमांक : सिटीएस/सीआर. ६४७३-६४८५/ना.भू. ४/०
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,
[महाराष्ट्र राज्य] पुणे यांचे कार्यालय.
पुणे, दिनांक /६/२००४

-1 JUL 2004

प्रति,

१. श्री. सतिश शेट्टी,
भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,
[महाराष्ट्र ] पुणे जिल्हा संघटक,
३०१, नारायण पेठ, पुणे-४११०३०

२. श्री. सुधाकर दत्तात्रय दिवे,
रा. ८० पंचवटी कॉलनी, तळेगाव दाभाडे,
मावळ, जिल्हा- पुणे.

विषय:- तळेगांव दाभाडे येथील न.भू.क्र. ५३०४/१ व ५३०४/२ चे निमताना मोजणी बाबत..

संदर्भ:- आपला दिनांक २५/१०/०१ व १७/९/०१ चा तक्रारी अर्ज..

महोदय,

संदर्भिय पत्रानुसार विषयांकित प्रकरणी इकडून चौकशीची कार्यवाही करणेत आलेली आहे. विषयांकित जमिनीची चुकीची मोजणी झाले बाबत दोषी कर्मचारी व अधिकारी यांचेवर विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असुन ती प्रगतीत आहे. वरील खुलासा अंती आपला संदर्भीय अर्ज इकडून दप्तरी दाखल करणेत आलेला आहे.

आपला विश्वासू,

(सही) ३०-६-०४

स्थळ प्र. उपसंभूअ संलग्न ज.आ.
[ना.भू.] पुणे यांची सही असे.

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त [नागरी भूमापन]
पुणे यांचे करिता

सीएम. २९.६.०४.

DISPATCHED
S. No. 32942 ते 32962
-1 JUL 2004

क्रमांक :सिटीएस/सीआर. ६४७३+-६४८५/०१
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,
(महाराष्ट्र राज्य) पुणे यांचे कार्यालय..
पुणे, दिनांक /६/२००४

प्रति,

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे

विषय:- तळेगांव दाभाडे येथील न.भू.क्र. ५३०४/१ व ५३०४/२ चे निमताना मोजणी बाबत..

संदर्भ:- आपलेकडील पत्र क्र.न.भू.२/का.वि. ४२३/सिटीएस/सीआर-६४७३+६४८५/०१ दिनांक २१/५/०४.

आपले कार्यलिया कडील संदर्भाधीन पत्रातील अहवालास अनुसरुन इकडील कार्यलिया कडील विषयांकित प्रकरणाची धारिका इकडुन बंद करण्यात आली आहे.

स्थळ प्र. उपसंभूअ संलग्न ज.आ.
(ना.भू.)पुणे यांची सही असे.

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन)
पुणे यांचे करिता

प्रत:- अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.

सीएम. २९.६.०४.

1 JUL 2004